**पर्यटन धोरण - २००६**
**राज्याच्या ग्रामीण भागातील पाणी**
**पुरवठा योजनांसाठी आकारण्यात**
**येणारी पाणीपट्टी**

महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापु-१००७/प्र.क्र.१७५/पापु-०७**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ७ नोव्हेंबर २००७**

संदर्भः पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.एमटीसी-२००५/२/
प्र.क्र.१७२ /पर्यटन दि.१६ डिसेंबर २००६

**शासन परिपत्रकः-**

राज्यातील पर्यटन व्यवसायाचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने दिनांक १६ डिसेंबर, २००६ च्या शासन निर्णयान्वये राज्याचे पर्यटन धोरण-२००६ घोषित केले आहे. या धोरणाच्या अनुषंगाने संबंधित प्रदेशातील पाणी पुरवठा योजनांच्या पाणीपट्टीच्या आकारणी संदर्भात क्षेत्रीय अधिका-यांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या संदर्भीय दि. १६-१२-२००६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४ नुसार पर्यटन स्थळ म्हणून घोषित केलेल्या प्रदेशातील पात्र घटकांना विविध करांमधून सूट घोषित करण्यात आली आहे. तर, पिण्याच्या पाणी पुरवठया संदर्भात परिच्छेद क्रमांक १० क (३) नुसार **पाणीपट्टीची आकारणी जास्तीत जास्त औद्योगिक दराने करण्यात येईल** व परिच्छेद क्रमांक ११ (१) नुसार सिंधुदुर्ग जिल्हयातील व अन्य क्षेत्रांसाठी पर्यटन क्षेत्रे म्हणून घोषित केलेल्या विशेष कार्यक्रमांतर्गत पाणीपट्टी व विद्युत शुल्क यामध्ये १० वर्षे कोणतीही वाढ होणार नाही. तथापि, अशा सेवांच्या कार्यान्विततेच्या खर्चात कोणतीही प्रत्यक्ष वाढ झाल्यास उपयोगकर्त्यांकडून पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार वसूली करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासनाने मागणी आधारित समूह सहभागाच्या पुरोगामी धोरणाचा स्विकार केलेला आहे. त्यानुसार ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांची मागणी, आखणी, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती या सर्व बाबींची जबाबदारी प्रादेशिक योजनांच्या बाबतीत जिल्हा स्तरावर जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती व ग्रामस्तरावर ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे सोपविण्यात आली आहे. त्यानुसार पाणी पुरवठा योजना सुरवातीला कार्यान्वित होण्यासाठी योग्य ती पाणी पट्टी आकारणे, तीत वाढ करणे ही बाब संबंधित समित्यांच्या अखत्यारीत आहेत. शासनाने पाणीपट्टीचे किमान दर निश्चित केलेले आहेत, मात्र पाणीपट्टीत वाढ करण्याची कोणतीही मर्यादा घातलेली नाही.

४. या अनुषंगाने पर्यटन स्थळ म्हणून घोषित केलेल्या प्रदेशातील ग्रामीण भागात पर्यटन धोरणानुसार पात्र ठरलेल्या घटकांसाठी पाणीपट्टीची आकारणी करताना ती औद्योगिक दरापेक्षा जास्त राहणार नाही याची काळजी घेण्यात यावी. तसेच, सिंधुदुर्ग जिल्हा व अन्य क्षेत्रांसाठी पर्यटन क्षेत्रे म्हणून घोषित केलेल्या विशेष कार्यक्रमांतर्गत प्रदेशांसाठी पाणीपट्टीच्या दरात पुढील १० वर्षे वाढ करण्यात येऊ नये. मात्र, शासन धोरणाच्या अधिन राहून योजनेच्या कार्यान्वयन खर्चात झालेल्या प्रत्यक्ष वाढीच्या अनुषंगाने पाणी पट्टीच्या दरात वाढ करण्यास हरकत नाही.

५. पर्यटन धोरणाच्या अनुषंगाने पात्र घटकांना प्राथम्याने नळ जोडणी करुन देणे, किमान परिस्थितीत पाणी पुरवठा सुरळीत राहील याची काळजी घेणे, याकडे संबंधित क्षेत्रीय अधिका-यांनी विशेष लक्ष द्यावे.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००७१११४१२१६०२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(श्री. श्री. घोलप)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,
विभागीय आयुक्त (सर्व)
सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ लि., मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, पापु-०७